MHAH220001772022

रे.मु.नं. ३३/२०२२
शिवाजी उर्फ शिवम वि. संदिप
राजाराम व इतर

<u>आदेश</u>
(नि.क्र.४४ खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द वाटप, जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर या दि. ०६/०९/२०२१ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र. २ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास अबेटमेंट सेट असाईड करण्यासाठी विनंती केली आहे. प्र.वादी यांनी सदर अर्जावर आक्षेप घेऊन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

४. वादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर या दि. ०६/०९/२०२१ रोजी मयत झाल्या बद्दल ग्रामपंचायत कार्यालय, आखोणी, ता. कर्जत, जि. अहमदनगर यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. प्र.वादी यांनी अर्जास स्पष्टीकरणासह आक्षेप नोंदवला नाही. अर्जदाराने त्याच्या अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले आहे. मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारसदार अभिलेखावर घेण्याचे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर माफीचा अर्ज मंजुर केला आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) वादीचा नि.क्र. ४४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे. वादी विरुध्द झालेला दावा अबटेचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.10.28 16:57:03 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :२८/१०/२०२५.